# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## - घोषणा -

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक 26 ऑगस्ट,** 2018 रोजी घेण्यात आलेल्या "**महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब (मुख्य) परीक्षा-2018 - सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक पदांकरीता मुख्य परीक्षा**" या स्पर्धा परीक्षेच्या **संयुक्त पेपर (पेपर क्र.** 1) या प्रश्नपत्रिकेच्या चारही संचाची प्रथम उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

**प्रस्तुत परीक्षेसाठी उमेदवारांना प्रश्नपत्रिकेच्या उत्तरतालिकेतील प्रश्न - उत्तरासंबंधी अभिवेदने करावयाची असल्यास, ती आयोगाने प्रसिध्द केलेल्या हरकतीच्या नमुन्यातच करावयाची आहेत. आयोगाच्या वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर "हरकतीचा नमुना" उपलब्ध आहे. आयोगाने विहित केलेल्या हरकतीच्या नमुन्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील हरकती स्विकारल्या जाणार नाहीत.** उमेदवारांनी त्यांच्या हरकती परीक्षा नियंत्रक व सहसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, $5^{1/2}$, 7 व 8 वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई 400021 या पत्त्यावर पाठवावे. या संदर्भात **दि.17 सप्टेंबर,** 2018 पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या निवेदनांचीच फक्त दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : 10 सप्टेंबर, 2018
ठिकाण : मुंबई

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई